**<u>ठळक बातम्या</u>**

- डिजिटल सुरक्षेसाठी थांबा, विचार करा, आणि मग कृती करा या तीन पायऱ्यांचा अवलंब करावा, असं मन की बात मधून प्रधानमंत्र्याचं  देशवासीयांना आवाहन

- देशातलं गेमिंग अवकाश झपाट्यानं विस्तारत असून भारत एक नवी क्रांती घडवण्याच्या मार्गावर असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- भारत-बांगलादेश सीमेवरील पेट्रापोल या लँडपोर्टवर उभारलेल्या ‘मैत्रीद्वार’ प्रवेशद्वाराचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते उद्घाटन

**आणि**

- विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्ष, काँग्रेस तसंच राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारांची तिसरी यादी जाहीर

**<><><><><>**

डिजिटल सुरक्षेसाठी थांबा, विचार करा, आणि मग कृती करा या तीन पायऱ्यांचा अवलंब करावा, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना केलं आहे. त्यांनी आज आकाशवाणीवरून मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा एकशे पंधरावा भाग होता.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी उदाहरणादाखल डिजीटल अटकेशी संबंधित फसवणूकीच्या फोन कॉलचं ध्वनीमुद्रण श्रोत्यांना ऐकवलं, फसवणूक करणाऱ्यांची कार्यपद्धती आणि अशा वेळी आपण घाबरून न जायची खबरदारी याविषयी देखील त्यांनी श्रोत्यांना समजावलं. डिजीटल अटक अशी कुठलीही तरतूद कायद्यात नाही,

तर ही फसवणूक आहे, अशा प्रकारची फसवणूक करणारे समाजाचे शत्रू आहेत, असं ते म्हणाले. या सगळ्याचा प्रतिकार करण्यासाठी अनेक तपास यंत्रणा आणि राज्य सरकारं परस्पर सहकार्यानं काम करत असून, त्यांच्यातल्या समन्वयासाठी राष्ट्रीय सायबर समन्वय केंद्राची स्थापना केली असल्याची माहिती त्यांनी दिली. समाजातल्या सगळ्यांच्या प्रयत्नांनीच आपण या आव्हानाचा सामना करू शकतो, असं ते म्हणाले.

**** बाईट (तीन पायऱ्या)****

सायबर फसवणुकीला बळी पडलेल्यांनी अधिकाधिक लोकांपर्यंत त्याबाबत माहिती पोहचवावी, जनजागृतीसाठी सेफ डिजीटल इंडिया या हॅशटॅगचा वापर करावा, अशा मोहिमांमध्ये शाळा आणि महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावं, असं आवाहन त्यांनी केलं. अशा घटनांविरोधात नागरिकांनी १९३० या राष्ट्रीय सायबर मदत क्रमांकावर अथवा सायबर क्राइम डॉट जीओव्ही डॉट इन या पोर्टलवर कळवावं अशी माहितीही त्यांनी दिली.

आशय आणि सर्जनशीलतेमुळे मनोरंजनपर ॲनिमेशनमधली भारतीयांची कामगिरी जगभर नावाजली जाते, त्यामुळेच भारतातील ॲनिमेशन स्टुडिओज, डिस्ने आणि वॉर्नर ब्रदर्स सारख्या जगातील नावाजलेल्या निर्मिती संस्थांबरोबर काम करत असल्याचं त्यांनी सांगितलं. देशातलं गेमिंग अवकाशही झपाट्यानं विस्तारत असून भारत एक नवी क्रांती घडवण्याच्या मार्गावर असल्याचं ते म्हणाले. ॲनिमेशन क्षेत्रामुळे भारतीयांची सर्वाधिक निर्मिती असलेल्या व्ही आर अर्थात आभासी पर्यटनालाही मोठी चालना मिळाली असल्याचं त्यांनी सांगितलं. उद्या २८ ऑक्टोबरला जागतिक ॲनिमेशन दिवस साजरा होणार असून, यानिमित्तानं देशाला जागतिक ॲनिमेशन ऊर्जा केंद्र बनवण्याचा संकल्प करायचं आवाहनही त्यांनी केलं.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी भारतानं लडाखमध्ये हानले इथं आशियातल्या सर्वात मोठ्या MACE या इमेजिंग टेलिस्कोपची स्थापना केल्याविषयीदेखील सांगितलं.

सरदार पटेल यांच्या १५० व्या जयंती वर्षाला येत्या ३१ ऑक्टोबरपासून, तर १५ नोव्हेंबरपासून भगवान बिरसा मुंडा यांच्या दीडशेव्या जयंतीला सुरुवात होणार असल्याचं स्मरण त्यांनी श्रोत्यांना करून दिलं. या दोन्ही महापुरुषांसमोरची आव्हानं वेगवेगळी होती, पण देशाची एकता हेच दोघांचं ध्येय होतं असं त्यांनी सांगितलं. बिरसा मुंडा वन फिफ्टी आणि सरदार वन फिफ्टी या हॅशटॅगसह देशाच्या विविधतेतल्या एकतेचा, वारश्याचा उत्सव साजरा करण्याचं आवाहन त्यांनी श्रोत्यांना केलं.

देशभरात शारीरिक तंदुरुस्तीविषयी वाढत चाललेल्या जाणिवेच्या उर्जेचा आपल्याला अनुभव येत असल्याचं ते म्हणाले. भारताच्या कला आणि संस्कृतीबद्दल जगभरात असलेल्या आकर्षणाचाही उल्लेख प्रधानमंत्र्यांनी आजच्या मन की बात मध्ये केला.

**<><><><><>**

गेल्या दहा वर्षात भूमीबंदरांचा जो विकास झाला आहे, त्यामुळे शेजारी देशांमधल्या भाषा, संस्कृती आणि साहित्य यांच्यामधील आदानप्रदानात भर पडत आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज सांगितलं. पश्चिम बंगालमध्ये पेत्रापोल या भारत-बांगलादेश सीमेवरील **पेट्रापोल** या लँडपोर्टवर उभारलेल्या ‘मैत्रीद्वार’ या प्रवेशद्वाराचं तसंच प्रवासी टर्मिनल इमारतीचं उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज झालं, त्यावेळी ते बोलत होते. लँडपोर्ट ॲथॉरिटीचे काम हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या समृद्धी, शांतता, भागा◌ीदारी आणि विकास या चतुःसुत्रीवर चालत असल्याचं शाह यांनी सांगितलं. बांगलादेशातून दररोज पाच

ते सहा हजार माणसे भारतात वैद्यकीय इलाजासाठी येतात. या भूमीबंदरावरच्या वाढत्या सुविधांमुळे व्यापार वाहतूकीत वाढ होईल, परिणामी मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस तसंच काँग्रेस पक्षानं आपापल्या उमेदवारांच्या तिसऱ्या याद्या जाहीर केल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं कारंजा इथून ज्ञायक पटनी, हिंगणघाटमधून अतुल वांदिले, अणुशक्तीनगर इथून फहाद अहमद, हिंगणा इथून रमेश बंग, चिंचवडमधून राहुल कलाटे आणि परळी विधानसभा मतदारसंघातून राजेसाहेब देशमुख यांना उमेदवारी जाहीर केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसनं गेवराई विधानसभा मतदारसंघातून विजयसिंह पंडित, फलटणमधून सचिन पाटील, निफाडमधून दिलीप बनकर आणि पारनेरमधून काशिनाथ दाते यांना उमेदवारी जाहीर केली आहे. काँग्रेसच्या यादीत १६ नावांचा समावेश आहे. यात दिग्रस मतदारसंघातून माणिकराव ठाकरे यांना, तर अंधेरी पश्चिममधून सचिन सावंत यांना काँग्रेसनं निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं आहे. कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघातून राजेश लाटकर आणि सांगलीतून पृथ्विराज लाटकर काँग्रेसकडून निवडणूक लढवणार आहेत.

<><><><><>

काँग्रेस उमेदवारी देण्यासाठी नातीगोती पाहत नसून जो जिंकेल त्यालाच उमेदवारी दिली जात आहे, असं काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी सांगितलं. ते

आज नागपूर इथं वार्ताहरांशी बोलत होते. काँग्रेस आज १४ उमेदवारांची यादी जाहीर करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान, कोणत्याही उमेदवारानं किंवा पक्षाच्या नेत्यानं कुणाच्याही भावना दुखावणारं वक्तव्य करू नये, अशा सूचना झारखंडच्या मुख्य निवडणूक अधिकारी नेहा अरोरा यांनी केलं आहे. अशा प्रकारची वक्तव्यं ही आचारसंहितेचं उल्लंघन ठरू शकतात, अशा प्रकरणात संबंधित व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज रायगड जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

या वर्षीच्या ऑगस्ट महिन्यात कर्मचारी राज्य विमा योजनेत २० लाख ७४ हजारांपेक्षा जास्त कर्मचाऱ्यांनी नोंदणी केली आहे. गेल्या वर्षीच्या ऑगस्ट महिन्याच्या तुलनेत नोंदण्यांमध्ये ६ पूर्णांक ८ शतांश टक्के जास्त कामगारांनी नोंदणी केल्याचं आकडेवारीतून दिसून आलं आहे. यापैकी जवळपास १० लाख कर्मचारी २५ वर्षांखालच्या वयोगटातले आहेत. ऑगस्ट महिन्यात नोंदणी केलेल्या कर्मचाऱ्यांपैकी ४ लाख १४ हजार महिला कर्मचारी आहेत.

<><><><>

दक्षिण मध्य रेल्वेनं, नांदेड-पनवेल-नांदेड आणि विजयवाडा-नांदेड या विशेष रेल्वे गाड्यांची प्रत्येकी एक फेरी चालवण्याचा निर्णय घेतला आहे. नांदेड-पनवेल नांदेड अशी अजून एक विशेष रेल्वे मनमाड - कल्याण मार्गे चालवण्याचं नियोजन होतं, मात्र प्रवाशांच्या प्रतिसादाअभावी ही गाडी रद्द करण्यात आली आहे.

<><><><>

मुंबईतील वांद्रे टर्मिनसवर आज  पहाटे अडीच च्या सुमाराला  प्रचंड गर्दी झाल्याने चेंगराचेंगरी झाली.  यात ९ जण जखमी झाले असून दोघांची प्रकृती गंभीर आहे. वांद्रे टर्मिनस, इथल्या फलाट क्रमांक एक वर वांद्रे-गोरखपूर  या गाडीत बसण्यासाठी मोठी गर्दी झाल्यामुळे ही चेंगराचेंगरी झाली. दिवाळीसाठी आपल्या गावी जाणाऱ्या मजुरांचा या गर्दीत समावेश होता.

<><><><>

गोंदिया जिल्ह्यात काल दोन दुचाकीस्वारांच्या झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला. या दोन्ही दुचाकी विरुद्ध दिशेनं येत होत्या, सडक अर्जुनी इथं रात्रीच्या वेळी त्यांची समोरासमोर धडक झाली. या अपघातात आणखी एक दुचाकीस्वार जखमी झाला असून, त्याला उपचारासाठी गोंदियाच्या शासकीय रुग्णालयात दाखल केलं आहे.

//<><><><>//